मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘एसटीपी’वर लक्ष ठेवण्यासाठी खासगी सल्लागार नेमण्यास गृहनिर्माण संस्थाधारकांचा विरोध

## निर्णय रद्द करण्याची करण्यात येत आहे मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण संस्थांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित आहेत किंवा नाही? यावर लक्ष ठेवण्यासाठी खासगी सल्लागार नियुक्ती आणि अर्थिक उधळपट्टीच्या धोरणाला चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने विरोध केला आहे. ही प्रक्रिया तत्काळ थांबवावी. अन्यथा आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडकरांच्या




कररुपी पैशातून प्रशासन विविध कामे, विकास प्रकल्प राबवत असते. एखाद्या महत्त्वूपर्ण प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्ती केल्यास, त्याचे स्वागतच करायला हवे. मात्र, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू आहेत किंवा नाही? या कामासाठीसुद्धा सल्लागार कंपनींवर उधळपट्टी केली जात असेल, तर महापालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने शहरातील ३३१ मोठ्या संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची खासगी संस्थेमार्फत पाहणी केली होती. त्यापैकी २८४ संस्थांमध्ये प्रकल्प सुरू आहेत. ४७ संस्थांमध्ये प्रकल्प बंद होते. त्यांना नोटीस बजावली असताना पुन्हा खासगी सल्लागार नियुक्ती करुन याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला भेट देणे, साप्ताहिक अहवाल सादर करणे, प्रकल्प कार्यान्वयीत असल्याबाबत माहिती संकेतस्थळावर टाकणे, पाण्याचा फेरवापर याबाबत पाहणी करणे अशी कामे सध्या पर्यावरण विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांतील संबंधित विभागाचे कर्मचारी करीत आहेत. मग, याच कामासाठी पुन्हा नव्याने खासगी सल्लागार संस्था नियुक्त करणे उचीत होणार नाही. त्यामुळे या कामासाठी सुरू असलेली निविदा प्रक्रिया रद्द करावी. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, महापालिका प्रशासन सल्लागारांवर उधळपट्टी करत आहे. छोट्या कामासाठी खासगी सल्लागारांची नेमणूक करून नागरिकांच्या कररुपी पैशाची उधळपट्टी चालू आहे ती थांबवली पाहिजे.

### २८४ संस्थांमध्ये प्रकल्प सुरू

**» महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडकरांच्या कररुपी पैशातून प्रशासन विविध कामे, विकास प्रकल्प राबवत असते. एखाद्या महत्त्वूपर्ण प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्ती केल्यास, त्याचे स्वागतच करायला हवे. मात्र, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू आहेत किंवा नाही? या कामासाठीसुद्धा सल्लागार कंपनींवर उधळपट्टी केली जात असेल, तर महापालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.प्रशासनाने शहरातील ३३१ मोठ्या संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची खासगी संस्थेमार्फत पाहणी केली होती. त्यापैकी २८४ संस्थांमध्ये प्रकल्प सुरू आहेत.**

# पालिकेच्यावतीने प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांद्वारे साजरा

## लोकशाहीची ज्योत भावी पिढीला सतत प्रेरणा देत राहील : आयुक्त

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** ज्या संविधानाने सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही मुल्ये दिली त्या संविधानाचा सन्मान करण्याचा आज दिवस आहे. प्रजासत्ताक दिन हा प्रत्येक भारतीयांसाठी राष्ट्रीय सण असून प्रत्येक भारतीयाला या सणाचा अभिमान असायला हवा. हा प्रजासत्ताक दिन आपल्या भूतकाळाचा अभिमान, आपल्या वर्तमानकाळातील जबाबदारी आणि आपल्या भविष्याची आशा या भावनेने साजरा करूया, या प्रवासात पुढे जात असताना स्वातंत्र्य आणि समतेची मशाल घेऊन जाऊया, जेणेकरून आपल्या लोकशाहीची ज्योत भावी पिढीला सतत प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.भारताच्या प्रजासत्ताक दिनाचा ७४ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महापालिकेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यास मोलाचे योगदान देणाऱ्या विद्युत विभागातील कर्मचारी, वैद्यकीय विभागातील स्टाफ नर्सेस तसेच वॉर्डबॉय, आया, लिफ्टमन, सफाई मित्र, शिपाई, उद्यान विभागातील कर्मचारी आणि वाहनचालक अशा विविध विभागातील एकूण ७५ कर्मचाऱ्यांचा फेटा बांधून आणि आयुक्तांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास आमदार उमा खापरे, माजी नगरसदस्य गोविंद पानसरे, नामदेव ढाके,अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, मुख्य लेखापरिक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता रामदास तांबे,श्रीकांत सवणे, उपआयुक्त विठ्ठल जोशी, संदिप खोत, मनोज लोणकर, मिनीनाथ दंडवते, निलेश भदाणे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, कर्मचारी महासंघाच्या चारूशीला जोशी, यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, महापालिका कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षण आंदोलनाला यश!

## पिंपरीत पेढे वाटून गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे व इतर मागण्यासाठी सकल मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चा आक्रमक होत मनोज जरंगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरला होता. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवली सराटी ते आझाद मैदान मुंबई पायी मोर्चा निघाला याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मोर्चा मुंबईच्या वेशीवर वाशी येथे पोचला असताना याची दखल घेत सरकारने दोन पावले पुढे टाकत सकारात्मक



चर्चा करत ज्यांची कुणबी म्हणून नोंद आहे त्यांच्या सर्व पितृसत्ताक रक्त नातेवाईकांना सगे सोयाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला.यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात मराठा समाजातील वंचित घटकाला याचा फायदा होणार आहे. या शासन निर्णयाचे स्वागत करीत पिंपरी चिंचवड मधील सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने फटाक्याची आतषबाजी करीत, एकमेकांना पेढे भरवत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, सचिन चिखले, धनाजी येळकर पाटील, संजय जाधव, अंगद जाधव, मीराताई कदम, नलिनी पाटील, हरेश नखाते, ज्ञानदेव लोभे, काशिनाथ जगताप, युवराज कोकाटे, गणेश आहेर, दीपक तरडे, गोविंद पवार, किशोर आट्टरगेकर, नकुल भोईर, गोरख पाटील व बहुसंख्य मराठा बांधव उपस्थित होते.

# समाज प्रबोधन करून प्रजासत्ताक दिन साजरा

## कामगार कल्याण केंद्र उद्योग नगरच्या वतीने लहान मुलांना खाऊ वाटप

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** कामगार कल्याण मंडळ उद्योगनगरच्या वतीने ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतमातेच्या रक्षणासाठी प्राणाची अवती देणाऱ्या शहीद जवानांना प्रथम श्रद्धांजली वाहिली, कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक प्रदीप बोरसे यांनी राज्य शासनाच्या प्रशिक्षण योजना, शिष्यवृत्ती योजना, अशा वेगवेगळ्या योजनांची माहिती दिली. मंडळ राबवत असलेल्या वेगवेगळ्या आस्थापनात मध्ये जाऊन आरोग्य शिबिराचे आयोजन,



महिला नाट्य स्पर्धा, बाल नाटक स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा, भजन स्पर्धा, कवी संमेलने, ताणतणाव पासून मुक्ती असे अनेक उपक्रम राबविले जातात, कामगारांच्या कुटुंबीयांसाठी व कामगारासाठी हे मंडळ विविध योजना राबवत आहे अशी माहिती त्यांनी दिली. आणि दोन दिवसापूर्वी पुणे गटातून पाच जिल्हा तून ऑनलाईन काव्यसंमेलन घेतले होते. कामगार कल्याण मंडळ उद्योगनगरचे सभासद व गुणवंत कामगार आण्णा जोगदंड यांना द्वितीय क्रमांक तर उत्तेजणार्थ यांना मिळाल्याचे बोरसे यांनी सांगितले. यावेळी गुणवंत कामगार अण्णा जोगदंड म्हणाले की, पुणे गटात उद्योग नगरचे काम खूपच चांगले, केव्हाही, कधीही प्रदीप बोरसे केंद्र संचालक कोणते प्रकारची माहिती हवी असल्यास कामगारांना त्वरीत देतात. कामगार कल्याण मंडळ जात, धर्म, पंथ असा भेदभाव न करता कामगाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. आणि सर्वांनी कामगार कल्याण योजनांचा कामगारांनी त्याचा फायदा करून घेण्याचे आवाहन जोगदंड यांनी केले. यावेळी राज्यस्तरीय कराटे मध्ये, गोल्ड,सिल्व्हर, ब्राँझ मिळवलेल्या सोहम मुळीक, निधी दळवी, प्रनिती निचिते, रचीत हळदे, हर्षवर्धन नवले, रुद्र शर्मा या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी टाटा मोटरचे सिनीअर व्यवस्थापक मयूर क्षिरसागर, गुणवंत कामगार, अण्णा जोगदंड, समाज प्रबोधनकार शारदाताई मुढे, मानवी हक्क संरक्षण आणि जाग्रतीचे कार्याध्यक्ष मुरलीधर दळवी, गुणवंत कामगार संगिता जोगदंड, महिला केंद्र प्रमुख दहीतुले अश्विनी जेष्ट साहित्यक सुरेश कंक, सुभाष चव्हाण, गुणवंत कामगार सुर्यकांत बरसावडे, सोमनाथ पतंगे, सतिश देशमुख, उद्धव कुंभार, भाऊसाहेब गायकवाड अमोल लोंढे, प्रीमियर. कामगार संघटनेचे उपाध्यक्ष नितीन आकोटकर, विलो कंपनीचे राजदत झेंडे, मुस्तफा मुलानी, संस्कृती कड, मच्छिंद्र कदम, एकनाथ उगले, प्रकाश वीर, अशोक गोरे महाराज सह अनेक गुणवंत कामगार उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंकडून मराठ्यांची दिशाभूल

## अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार नाही

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करून मराठा समाजाला आरक्षण दिल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्यानंतर ओबीसी नेत्यांनी विरोध केल्यानंतर आता घटनातज्ज्ञ सुद्धा साशंक आहेत. घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोललेला प्रत्येक शब्द लिहून ठेवल्याचे सांगत ओबीसींना धक्का न लावता ५० टक्क्यांवर, कायद्यात बसणारं, कोर्टात टिकणारं आरक्षण देऊ म्हणाले, ही जनतेची दिशाभूल आहे.

ही लढाई सुप्रीम कोर्टात जाणार असून त्याठिकाणी भवितव्य निश्चित होईल, अशी प्रतिक्रिया दिली आहे.बापट यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले हे लोकशाहीचा विजय असल्याचे म्हणाले. मात्र, अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार की नाही हे सर्वो च्च न्यायालयात ठरवेल,





असेही त्यांनी नमूद केले. एखादा समाज मागास आहे हे ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाला ट्रीपल टेस्ट करणं बंधनकारक केलं आहे. त्या नियमाची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे उल्हास बापट म्हणाले. उल्हास बापट म्हणाले की, मराठा समाज ८० ते ९० टक्के मागास आहे हे खरं असलं, तरी क्रिमिलेअरची व्याख्या केलेली नाही. आरक्षण दोन प्रकारे देता येते. एक कायदेमंडळ करते आणि दुरुस्ती करून वाढवते ते २०३० मध्ये होईल. कलम १५ आणि १६ मध्ये नोकऱ्या आणि शिक्षणासंदर्भात आहे. आरक्षण ही सुविधा, तो मुलभूत अधिकार नाही हे समजून घ्यावं लागेल. ते पुढे म्हणाले की, सध्या ५० टक्क्यांवर आरक्षण देता येत नाही. ते बदलायचं झाल्यास ११ न्यायमूर्तींचे घटनापीठ करून करावं लागेल. मात्र, अशी स्थिती नाही. कोणताही समाज मागास ठरवून आरक्षण देताना ट्रिपल टेस्ट असून मागासवर्गीय आयोग, इम्पिरिकल डेटा आणि ते ५० टक्क्यांवर वर जाता कामा नये, असा कायदा सांगतो. त्यामुळे दाखल्यातून दिलेलं आरक्षण हे बसतं का बघावं लागेल. त्याचबरोबर बापट यांनी देवेंद्र फडणवीसांनी दिलं होतं ते देता येणार नाही, हे मी सांगितलं होतं. पुढे सर्वोच्च न्यायालयात जाऊन रद्द होईल. त्यामुळे ५० टक्क्यांच्या आत ओबीसीमधून आरक्षण आणि मराठा मागास आहे हे सिद्ध करावं लागेल. जरांगेंनी तोच मुद्दा मांडला आम्ही मागास, ओबीसीमधून आरक्षण द्या अशी मागणी केल्याने त्यामुळे वाद सुरु झाल्याचे ते म्हणाले. मराठा आरक्षण २०१८ मध्ये उच्च न्यायालयाने कसं मान्य केलं हे कळत नाही, सुप्रीम कोर्टाचा स्पष्ट निर्णय असातनाही दिलं गेलं. आरक्षण देताना मागास आयोगाने मागास ठरवलं पाहिजे, त्यांनी ठरवून ताजा डेटा सांगितला पाहिजे. सगळ्यांकडे एक पाहिजे, तरच हे कोर्टात टिकेल. इथून निश्चित लोक सुप्रिम कोर्टात जाणार असल्याने सुप्रीम कोर्ट काय ते ठरवेल, असेही त्यांनी सांगितले. बापट यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले हे लोकशाहीचा विजय असल्याचे म्हणाले. मात्र, अध्यादेशाच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार की नाही हे सर्वो च्च न्यायालयात ठरवेल, असेही त्यांनी नमूद केले. एखादा समाज मागास आहे हे ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाला ट्रीपल टेस्ट करणं बंधनकारक केलं आहे. त्या नियमाची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे उल्हास बापट म्हणाले. उल्हास बापट म्हणाले की, मराठा समाज ८० ते ९० टक्के मागास आहे हे खरं असलं, तरी क्रिमिलेअरची व्याख्या केलेली नाही. आरक्षण दोन प्रकारे देता येते. एक कायदेमंडळ करते आणि दुरुस्ती करून वाढवते ते २०३० मध्ये होईल. कलम १५ आणि १६ मध्ये नोकऱ्या आणि शिक्षणासंदर्भात आहे. आरक्षण ही सुविधा, तो मुलभूत अधिकार नाही हे समजून घ्यावं लागेल. ते पुढे म्हणाले की, सध्या ५० टक्क्यांवर आरक्षण देता येत नाही. ते बदलायचं झाल्यास ११ न्यायमूर्तींचे घटनापीठ करून करावं लागेल. मात्र, अशी स्थिती नाही. कोणताही समाज मागास ठरवून आरक्षण देताना ट्रिपल टेस्ट असून मागासवर्गीय आयोग, इम्पिरिकल डेटा आणि ते ५० टक्क्यांवर वर जाता कामा नये, असा कायदा सांगतो. त्यामुळे दाखल्यातून दिलेलं आरक्षण हे बसतं का बघावं लागेल. त्याचबरोबर बापट यांनी देवेंद्र फडणवीसांनी दिलं होतं ते देता येणार नाही, हे मी सांगितलं होतं. पुढे सर्वोच्च न्यायालयात जाऊन रद्द होईल. त्यामुळे ५० टक्क्यांच्या आत ओबीसीमधून आरक्षण आणि मराठा मागास आहे हे सिद्ध करावं लागेल. जरांगेंनी तोच मुद्दा मांडला आम्ही मागास, ओबीसीमधून आरक्षण द्या अशी मागणी केल्याने त्यामुळे वाद सुरु झाल्याचे ते म्हणाले.

# संस्था चालकाकडून तीन अल्पवयीन मुलांवर अत्याचार

## आरोप दासोपंत उर्फ स्वामी हरिभाऊ उंडाळकरवर गुन्हा दाखल

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
वारकरी संप्रदायाला हादरवणारी घटना पुण्यातील देवाची आळंदीत घडली आहे. एका महाराजावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानं वारकरी सांप्रदायमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. तीन अल्पवयीन मुलांवर नैसर्गिक कृत्य केल्याचा आरोप या महाराजावर आहे. दासोपंत उर्फ स्वामी हरिभाऊ उंडाळकर (५२ वर्षे) असं या नराधम महाराजाचे नाव आहे. दासोपंत महाराज मृदुंग वारकरी शिक्षण संस्था चालवतो. साधारण सत्तर विद्यार्थी दासोपंत महाराजांकडे मृदुंग वाद्याचे धडे घेतात. पण दिवाळीनंतर दासोपंत बिथरले, सुरवातीला एक व्यसनाधीन विद्यार्थ्याला ब्लॅकमेल केलं आणि त्याच्यावर अनैसर्गिक कृत्य केलं. मग त्यानंतर दासोपंत महाराजांमधील हैवान जागा झाला. तीन विद्यार्थ्यांवर मनाची इच्छा पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी अनैसर्गिक कृत्य



करतच राहिले. कोणाला सांगितल्यास बरं वाईट होईल असं त्यानं धमकावले होते. मात्र एका विद्यार्थ्याला या वेदना असह्य झाल्यानं, त्याने वडिलांच्या कानावर ही बाब टाकलीसुरुवातीला पोलिसांना ही यावर विश्वास बसेना. त्यामुळं पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याऐवजी याकडे कानाडोळा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळं पीडिताच्या पालकाने गोंधळ घातला. मग वरिष्ठांनी यात लक्ष घातलं. सदरच्या मुलीने आपल्या आईला या अत्याचाराचे माहिती दिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर दासोपंत महाराजांचं बिंग फुटलं. हे पाहून उर्वरित दोन मुलांनीही त्यांच्या कुटुंबाला याबाबत कळवलं. त्यामुळं आत्तापर्यंत तीन अल्पवयीन मुलांवर नराधम दासोपंत महाराजांवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पॉक्सो कलमाखाली आळंदी पोलिसांनी गुन्हा दाखल करून नराधम महाराजास बेड्या ठोकल्या आहेत. आणखी कुणी पीडित असल्यास त्यांना पुढं येण्याचं आवाहनही पोलिसांनी केलंय. या घटनेमुळं वारकरी संप्रदायात मात्र एकच खळबळ उडालेली आहे.लातूर जिल्ह्यातील वलांडी या गावातील एका सहा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघड झाली आहे. याच गावातील अल्ताफ महेबूब कुरेशी या युवकांने घराशेजारी राहणाऱ्या सहा वर्षीय मुलीवर काही दिवसापासून लैंगिक अत्याचार केल्याची माहिती समोर आली.

# पुण्यात मराठा सर्वेक्षणाला वेग

## ‘एवढ्या’ कुटुंबांची माहिती झाली संकलित

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या नियोजनानुसार मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील नागरिकांच्या सर्वेक्षणाला २३ जानेवारीपासून सुरुवात झाली. पहिले दोन दिवस तांत्रिक अडथळ्यांना प्रशासनाला सामोरे जावे लागल्यानंतर आता सर्वे क्षणाला वेग आला आहे. गुरुवारपर्यंत (२५ जानेवारी) शहरासह जिल्ह्यात कटक मंडळे (कॅन्टोन्मेंट बोर्ड) वगळून चार लाख २३ हजार ८५४ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. शुक्रवार, शनिवार आणि रविवार (२६, २७ आणि २८ जानेवारी) या शासकीय सुट्यांच्या कालावधीत सर्वेक्षणाशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच तहसील, प्रांत आणि जिल्हाधिकारी ही कार्यालये सुरू ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार शनिवारपर्यंत पुणे शहरात दोन लाख ९७ हजार २१० कुटुंबांचे, पिंपरी-चिंचवडमध्ये एक लाख ९९ हजार ४५९, तर ग्रामीण भागातील नगरपंचायत क्षेत्रात दोन लाख ९६ हजार ३९० अशा एकूण सात लाख ९३ हजार ५९ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले. कटक मंडळे आणि ग्रामीण भागातून तब्बल ४९ लाख नागरिकांचे सर्वे क्षण करायचे आहे, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका मिळून सुमारे एक कोटीपेक्षा अधिक नागरिकांचे सर्वे क्षण केले जाणार आहे. कटक मंडळातील सर्वेक्षण देखील शुक्रवारपासून (२६ जानेवारी) सुरू करण्यात आले आहे.गुरुवारपर्यंत (२५ जानेवारी) शहरासह जिल्ह्यात कटक मंडळे (कॅन्टोन्मेंट बोर्ड) वगळून चार लाख २३ हजार ८५४ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. शुक्रवार, शनिवार आणि रविवार (२६, २७ आणि २८ जानेवारी) या शासकीय सुट्यांच्या कालावधीत सर्वेक्षणाशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच तहसील, प्रांत आणि जिल्हाधिकारी ही कार्यालये सुरू ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार शनिवारपर्यंत पुणे शहरात दोन लाख ९७ हजार २१० कुटुंबांचे, पिंपरी-चिंचवडमध्ये एक लाख ९९ हजार ४५९, तर ग्रामीण भागातील नगरपंचायत क्षेत्रात दोन लाख ९६ हजार ३९० अशा एकूण सात लाख ९३ हजार ५९ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले. कटक मंडळे आणि ग्रामीण भागातून तब्बल ४९ लाख नागरिकांचे सर्वेक्षण करायचे आहे.गुरुवारपर्यंत (२५ जानेवारी) शहरासह जिल्ह्यात कटक मंडळे (कॅन्टोन्मेंट बोर्ड) वगळून चार लाख २३ हजार ८५४ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. शुक्रवार, शनिवार आणि रविवार (२६, २७ आणि २८ जानेवारी) या शासकीय सुट्यांच्या कालावधीत सर्वेक्षणाशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच तहसील, प्रांत आणि जिल्हाधिकारी ही कार्यालये सुरू ठेवण्यात आली आहेत.



### कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द

**» महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या नियोजनानुसार मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील नागरिकांच्या सर्वेक्षणाला २३ जानेवारीपासून सुरुवात झाली. पहिले दोन दिवस तांत्रिक अडथळ्यांना प्रशासनाला सामोरे जावे लागल्यानंतर आता सर्वेक्षणाला वेग आला आहे. गुरुवारपर्यंत (२५ जानेवारी) शहरासह जिल्ह्यात कटक मंडळे (कॅन्टोन्मेंट बोर्ड) वगळून चार लाख २३ हजार ८५४ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. शुक्रवार, शनिवार आणि रविवार (२६, २७ आणि २८ जानेवारी) या शासकीय सुट्यांच्या कालावधीत सर्वेक्षणाशी संबंधित सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत.**

# पायाभूत सुविधांद्वारे जिल्ह्याच्या विकासाचा संकल्प

## शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वहिनी योजनेवर भर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे हा वेगाने नागरीकरण होत असलेला जिल्हा आहे. जिल्ह्यातील रस्ते, मेट्रो, रेल्वे मार्गाद्वारे विकासाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. खोपोली ते खंडाळा मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात आहे. शहरातील वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यासाठी विविध विकासकामे सुरू केली आहेत. जिल्ह्यातील विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मितीचा संकल्प असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलिस कवायत मैदानात आयोजित समारंभात ते बोलत होते. या वेळी पुणे पोलिस आयुक्त रितेश कुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पोलिस अधीक्षक अंकित गोयल आदी उपस्थित होते. या वेळी झालेल्या संचलनाचे नेतृत्व परेड कमांडर दर्शन दुगड यांनी केले. याप्रसंगी महाळुंगे पोलिस ठाण्याचे राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर झालेले वरिष्ठ निरीक्षक वसंतराव बाबर तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सुभेदार सतीश बापूराव गुंगे, नामदेव संभाजी भोसले, हवालदार नवनाथ सोपान भोसले यांचा गौरव करण्यात आला. तसेच हुतात्मा नायक बालाजी डुबुकवाड यांच्या पत्नी अर्चना डुबुकवाड यांचा ताम्रपट प्रदान करण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या वेळी अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते.

